# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २८/०७/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २८/०७/२००३ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. २५/०७/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ७) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ८) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ११) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १४) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| १५) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

**लिओ कोलासो :-**

सभापती साहेब, उपआयुक्त साहेब येथे मला एक हरकतीचा मुद्दा मांडायचा आहे. मागची तिसरी, चौथी सभा झाली त्यावेळी कामगारांना इलेक्शनाचा भत्ता देण्याबद्दल प्रश्न मोडला होता. त्यावेळी सांगण्यात आले होते की, मानधन पुढच्या सभेपुर्वी देण्यांत येईल. पण त्यांना अजूनपर्यंत मानधन देण्यांत आलेले नाही. हे येथे कामकाज कोणत्या पद्धतीने चालले आहे हे आम्हांला कळत नाही. असाच प्रकार चालू राहिला तर आम्ही येथे सत्याग्रह करु.

**मा. सभापती :-**

आपण जी आपली भावना व्यक्त केली आहे त्या भावनेशी मी सहमत आहे व पुढच्या सभेपर्यंत कामगारांना इलेक्शनाचा भत्ता देण्यांत येईल.

**मा. केळकर सो. :-**

आमच्याकडून लवकरात लवकर काम केले जाईल.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमने सही ढंग से काम करने के लिए कर्मचारी के उपर अंकुश लगाया है। और काम करने के लिए दबाव भी डाला है। वैसे उनको प्रमोशन देने का है, वह मुद्दा भी अभी तक सभा मे नही आया है।

**मा. केळकर सो :-**

महानगरपालिकेने यादी तयार केली आहे. पदोन्नती समिती निश्चित करुन तीस तारखेला सभा लावण्यांत आलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

पदोन्नती समिती जी आहे त्याच्यामध्ये कोण कोण असणार आहे.

**मा. केळकर सो :-**

शासनाने गाईडलाईन दिले आहे. कमिशनर सो., उपायुक्त सो., मागासवर्गीय प्रतिनिधी व आस्थापना प्रमुख हे असणार आहेत.

(प्र. सचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११२ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

२१/०६/२००३ च्या इतिवृत्तांतात पान क्र. २२ वर जो ठराव कम्प्लाई करुन घ्यायचा होता तो घेतला आहे का? एका महिन्याच्या आतमध्ये कम्प्लाई करुन तुम्हांला दाखवायचे आहे. सभापतींना ही माहिती नाही ह्याचा अर्थ तुम्ही त्यांना सांगितलेले नाही.

**मा. सभापती :-**

बेलवटेजी कम्प्लाई तुम्ही पुढच्या सभेमध्ये घेऊन या.

**धनराज अग्रवाल :-**

२७/०६/२००३ च्या इतिवृत्तांतात पान क्र. ४ वर गाळ्याचा जो विषय आहे ते सविस्तर माहिती घेतो व त्या गाळेधारकांना बोलावून चर्चा करतो असे केळकर सो. बोलले होते. तर त्या गाळेधारकांना बोलावण्यांत आले होते का?

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिति सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य , अधिकारी वर्ग , कर्मचारी वर्ग , आपणा सर्वांचे स्वागत करुन आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.२० वाजता.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**